# प्रेसनोट

दि. ०६/०६/२०२४

## तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जुन्नर, जि. पुणे येथील कृषी पर्यवेक्षक यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. बापु एकनाथ रोकडे, वय ५७ वर्ष, पद – कृषी पर्यवेक्षक, नेमणुक – तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जुन्नर, जि. पुणे.(वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,०००/- रुपये (चार हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ०६/०६/२०२४ |
| सापळा दिनांक | दि. ०६/०६/२०२४ |

ठिकाण :- दिनांक ०६/०६/२०२४ रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जुन्नर, जि. पुणे..

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांना लॉटरी पद्धतीने शासकीय अनुदानामध्ये ट्रॅक्टर मंजूर झाला होता. सदरचे शासकीय अनुदान मंजूर करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता तक्रारदार यांनी केलेली असून, ट्रॅक्टरचे मंजूर अनुदान मिळण्यासाठी तक्रारदार हे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जुन्नर येथील कृषी अधिकारी लोकसेवक बापु रोकडे यांना भेटले असता, लोकसेवक बापू रोकडे यानी तकारदार यांचेकडे ट्रॅक्टरचे अनुदान मंजूर करण्यासाठी ५,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे यांना दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसवेक बापु रोकडे यांनी तक्रारदार यांचेकडे ट्रॅक्टरची शासकीय अनुदानाची रक्कम मंजूर करण्यासाठी तडजोडीअंती ४,०००/- रुपयेची लाच रकमेची मागणी करुन, लोकसेवक बापु रोकडे यांनी तक्रारदार यांचेकडून ४,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर लोकसेवक बापु रोकडे यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner